# राष्ट्रीय सेवा योजना विभाग,

## संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर

# नियमित कार्यक्रम अहवाल

## शैक्षणिक वर्ष -२०१९-२०२०

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणा बरोबरच युवकामध्ये सामाजिक जानिव जागृती निर्माण करण्यासाठी त्यांचा सर्वांगीत व्यक्तीमत्व विकास घडवुन आणण्यासाठी आपल्या जवळ आसपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिळुन मिसळून त्यांना समजावुन घेऊन रचनात्मक कार्य करण्यासाठी, स्वावलंबन, चारित्र्य संबर्धन व सामाजिक बांधीलकीची जाणिव निर्माण करुन तिचा विकास करण्यासाठी युवकामधील नेतृत्व गुण विकसीत करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी समाजातील गोर गरीब वर्गाची सेवाची करण्याची इच्छा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करण्यासाठी जातीभेद, वर्णभेद, भाषिकवाद, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, हुंडापध्दती, स्त्रियावरील अन्याय अत्याचार, स्त्रीभुण हत्या, मानविहक्काचे उल्लंघन, प्रदुषण पर्यावरनाचा ऱ्हास यासारख्या समस्येचे उच्चाटन करण्यासाठी व महात्मा गांधीचे स्वप्न साकार करुन विद्यार्थ्यांच्या मनात मानव प्राण्याबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी आमच्या संजीवनी महाविद्यालयामध्ये रा. से. यो. विभाग कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत १२५ विद्यार्थ्यांचे युनिट कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास साधण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये रा. से. यो. विभागांतर्ग विविध उपक्रम राबविण्यात आले , त्याचा सविस्तर अहवाल खालील प्रामाने सादर करण्यात येत आहे.

दिनांक ७ एप्रिल २०१९ रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी प्रा. डॉ. मंदागीनी थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे साहेब अध्यक्ष म्हणून लाभले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला .

दिनांक १४ एप्रिल २०१९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात अली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते महापुरुष्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अर्पण करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राद्यापक डॉ. जितेंद्र कांबळे यांचे बाबासाहेबांच्या जीवन चारित्र्यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राद्यापकांनी आस्वाद घेतला.

दिनांक १ मे २०१९ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला . या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वरील विशेष दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात विविध कार्यकर्याक्रमाचे आयोजन करण्यात आले .

दिनांक ७ मे २०१९ रोजी महाविद्यालयांमधील रा. से. यो. विभागांतर्गत रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी करण्यात अली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सर यांनी महापुरुष्याच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. या दिनाचे औचित्य साधून रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवन चारित्र्यावर प्रा. सी.एम . बावलगावे सरांचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक ३१ मे २०१९ रोजी महाविद्यालयातील रा. से. यो. विभागांतर्गत अहिल्याबाई होळकर जयंती साजरी करण्यात अली . या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . या कार्यक्रमासाठी डॉ. मंदागीनी थोरात या मार्गदर्शक म्हणून लाभल्या.

दिनांक ५ जून २०१९ रोजी जागतिक जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सर यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी वृक्षारोपन केले. या प्रसंगी प्रा. चोले पी. आर . हे मार्गदर्शक म्हणून लाभले. मार्गदर्शकांनी उपस्थितांना वृक्षारोपन व पर्यावरण समतोल या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक २१ जून २०१९ रोजी जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी योग गुरु यांनी योगाचे धडे दिले. या योग दिनाचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी घेतला.

दिनांक २६ जुन २०१९ रोजी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्रा. बावलगावे सी. एम. हे मार्गदर्शक म्हणून लाभले. या प्रसंगी मार्गदर्शकांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याबद्दल माहिती दिली.

दिनांक ०१ जुलै २०१९ ते ७ जुलै २०१९ दरम्यान वृक्षारोपन सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहामध्ये महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपन करण्यात आले. या मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. मधील सर्व स्वयंसेवक व प्राध्यापक यांनी भाग घेतला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विषयाचे प्राध्यापक श्री चोले प्रशांत रमेशराव हे मार्गदर्शक म्हणून लाभले. प्रमुख मार्गदर्शकानी उपस्थितांचे मार्गदर्शन केले.

दिनांक ३ जुलै २०१९ रोजी दुपारी ठीक १.०० वाजता महाविद्यालयातील रा.से.यो. सल्लागार मंडळाची बैठक महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली . या बैठकीमध्ये अनेक मुद्यावर सखोल चर्चा करण्यात आली व रा.से.यो. मार्फत संपूर्ण शैक्षणिक वर्षात घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. या बैढकीस रा.से.यो. सल्लागार मंडळाच्या सर्व सदस्यांची उपस्थिती लाभली.

दिनांक ११ जुलै २०१९ रा. से. यो. विभागांतर्गत तंबाखू मुक्ती शपथ घेण्यात आली .

दिनांक २० जुलै २०१९ ते २५ जुलै २०१९ दरम्यान महाविद्यालयामध्ये रा.से.यो. स्वयंसेवक नोंदनी करण्यात आली.

दिनांक १ ऑगस्ट २०१९ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात अली. या प्रसंगी महापुरुष्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील समाजशात्र विभागाचे प्राध्यापक डॉ. सिद्धेश्वर शेटकर हे मार्गदर्शक म्हणून लाभले. मार्गदेर्शकांनी दोन्ही महापुरुषांच्या कार्याबद्दल माहिती दिली.

दिनांक १ ऑगस्ट २०१९ ते १५ ऑगस्ट २०१९ दरम्यान स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला या पंढरवाड्यामध्ये अनेक उपक्रम राबवण्यात आले. या मध्ये महाविद्यालय परिसर व वर्ग खोल्यांची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी एक दिवशीय श्रमदान शिबीर घेण्यात आले. या मध्ये महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली.

दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी भारत रत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून सदभावना दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयामध्ये सर्वांना सामजिक सदभावनेची शपथ देण्यात आली

दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी भारताच्या ७२ व्या स्वतंत्र्य दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये गावामधून प्रभातफेरी काढण्यात आली. नंतर महाविद्यालयामध्ये ध्वजारोहण घेण्यात आले. या प्रसंगी डॉ. बावलगावे चंदन मारोतीराव हे मार्गदर्शक म्हणून लाभले. प्रमुख मार्गदर्शकांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमास सर्व प्राद्यापक व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी रक्षाबंधांचे औचित्य साधून महाविद्यालयातील रा.से.यो. विभागामधील स्वयंसेविकांनी बी.एस.एफ. येथील जवानांना राख्या बांधून रक्षाबंधन सन साजरा केला. या प्रसंगी बी.एस.एफ. चे डी. आय .जी . संजय गहलोत, जवान व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ५ सप्टेंबर २०१९ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

दिनांक १७ सप्टेंबर २०१९ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व स्व.रा. ति.म. विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रभातफेरी व ध्वाजारोहन हे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २४ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रयीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाचे माजी कार्यक्रमाधिकारी डॉ. जितेंद्र कांबळे सर हे लाभले. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना रा.से.यो. चे महत्व पटवून दिले.

दिनांक ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. भागवत फुलमंटे हे लाभले. राष्ट्रीय स्वच्छता दीनानानिमित्य स्वच्यता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी भारत रत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. इंदिरा गांधी जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक १४ नोव्हेंबर २०१९ रोजी स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक २८ नोव्हेंबर २०१९ रोजी जेष्ठ समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील समाजशास्त्र विधागाचे प्रा. डॉ. सिद्धेश्वर शेटकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

दिनांक २६ नोव्हेंबर २०१९ संविधान दिन साजरा करण्यात आला व २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली.

दिनांक ०५ डिसेम्बर २०१९ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घटन मा. आमदार विनायकरावजी पाटील साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराचा अनेक रुग्णांनी लाभ घेतला.

दिनांक ६ डिसेंबर २०१९ रोजी भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महामानवास आदरांजली वाहण्यात आली.

दिनांक २० डिसेंबर २०१९ रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा स्मृती दिन साजरा करण्यात आला. या दिनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

दिनांक २२ डिसेंबर २०१९ रोजी श्रेष्ठ गणित तज्ज्ञ डॉ. रामानुज यांचा जन्म दिवस गणित दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त मतदार जनजागरण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी चाकूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार भरत सूर्यवंशी साहेब हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले व महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यक्ष म्हणून लाभले. या प्रसंगी रा.से.यो. स्वयंसेवकांनी विविध पथनाट्याद्वारे मतदार जनजागृती केली.

२६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातून गावामध्ये प्रभातफेरी काढण्यात आली . त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० ते १३ फेब्रुवारी २०२० दरम्यान मौजे नायगाव ता. चाकूर जि. लातूर येथे "पर्यावरण, नैसर्गिक साधन संपत्ती संवर्धन व स्वच्छ भारत अभियान" विशेष वार्षिक

शिबीर आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले. त्यामध्ये बौद्धिक, समाजप्रबोधनात्मक कीर्तन, वृक्षारोपण, स्वच्छता, महिला मेळावा, जनजागरण,सांस्कृतिक, पशुरोगनिदाण शिबीर इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

प्रा. शिंदे अच्युत रामराव यांनी E. T. I. अहमदनगर येथे दिनांक १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२० दरम्यान आयोजित १४६ उदबोधन वर्ग येशेस्वीरित्या पूर्ण केले .

दिनांक १९ फेब्रुवारी २०२० रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा. चंदन बावलगावे हे लाभले. प्रमुख मार्गदर्शकांनी शिवराय यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचा सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी लाभ घेतला.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२० रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक १४ मार्च २०२० रोजी रा.से.यो. सल्लागार मंडळाची वार्षिक आढाव बैठक आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाधिकारी

Programme Officer
Sanjeevanee Mahavidyalaya
Chapoli Tq. Chakur Dist. Latur

प्राचार्य

प्राचार्य
संजीवनी महाविद्यालय, चापोली
ता. चाकूर जि. लातूर



२१ जुन २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.




दि. २६/०६/२०१९ रोजी राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.



दि. ११ जुलै २०१९ रोजी तंबाखु मुक्ती शपथ घेण्यात आली




दि. ०१/०८/२०१९ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



दि. 15 ऑगस्ट 2019 रोजी रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.




सदृढ भारत कार्यक्रम घेण्यात आला.



दि. 02/10/2019 रोजी स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाविद्यालयात स्वच्छता करण्यात आली.




दि. 15/10/2019 रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. आब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली.




दि. 6/12/2019 रोजी भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.



दि. 20/12/2019 रोजी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला.




बाल हक्क दिन साजरा करण्यात आला.



एक दिवशीय श्रमदान घेण्यात आले.



19/01/2019 पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवण्यात आली.




दि. 24/01/2019 बालिकादिन साजरा करण्यात आल